क्रमांक : १८४१ /क-१
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई
दिनांक : ०८/०२/२०२४

**विषय :- या सचिवालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांची कार्यालयातील उपस्थिती बायोमेट्रिक यंत्रणेवर नोंदविण्याबाबत**

**संदर्भ :- या सचिवालयाचे परिपत्रक क्रमांक १६८५८/क-१, दि. २१ नोव्हेंबर, २०२३**

**:: परिपत्रक ::**

उपरोक्त संदर्भाधीन परिपत्रकान्वये सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत तळमजल्यावरील लॉबीचे नुतनीकरणाचे काम सुरु असल्याने सद्य:स्थितीत कार्यान्वित असलेली बायोमेट्रीक यंत्रणा बंद करण्यात आल्याने बुधवार, दिनांक २२ नोव्हेंबर, २०२३ रोजीपासून या सचिवालयातील गट-ब (अराजपत्रित) व गट-क संवर्गातील सर्व अधिकारी-कर्मचारी, मा.समिती प्रमुख यांच्या आस्थापनेवरील कार्यरत असलेले स्वीय सहायक तसेच तात्पुरत्या स्वरुपात कार्यरत असलेले सर्व कर्मचारी यांनी कार्यालयात येताना उपस्थितीची नोंद हजेरीपटावर करावी, असे कळविण्यात आले होते.

सदरहू बायोमेट्रिक यंत्रणा पुन्हा कार्यान्वित करण्यात आल्याने शुक्रवार, दिनांक ०९ फेब्रुवारी, २०२४ रोजीपासून या सचिवालयातील गट-'अ' (राजपत्रित), गट-'ब' (राजपत्रित), गट-'ब' (अराजपत्रित) गट-'क' व गट-'ड' या संवर्गातील सर्व अधिकारी / कर्मचारी तसेच सुरक्षा व अग्निशमन विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी, मा.समितीप्रमुख यांच्या आस्थापनेवर कार्यरत असलेले स्वीय सहायक, शिपाई तसेच तात्पुरत्या स्वरुपात कार्यरत असलेले सर्व कर्मचारी यांनी कार्यालयात येताना व कार्यालयातून जाताना उपस्थितीची नोंद बायोमेट्रिक यंत्रणेवर नोंदविणे अनिवार्य राहील.

आदेशानुसार

**(सुभाष नलावडे)**
उप सचिव
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**प्रति,**

१) मा. सचिव (१) (कार्यभार), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.
२) मा.सचिव (२) (कार्यभार), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.

३) मुख्य सुरक्षा अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.

४) समादेशक अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.

५) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी/ कर्मचारी.

६) सर्व मा.समिती प्रमुख यांचे कार्यालय.

७) कक्ष अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

८) क-२ संगणक कक्ष

९) निवडनस्ती.